# बृहन्मुंबई महानगरपालिका

सहाय्यक आयुक्त, एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय, दुसरी हसनाबाद गल्ली, खार रोड (पश्चिम),
मुंबई-४०००५२, दूरध्वनी : ०२२२६४४०१२०

**क्रमांक** : ACHW/1948/AEM/Gen **दिनांक** : 08/01/2026

## "स्थळ दरपत्रक सूचना"

मान. सहाय्यक आयुक्त, एच/पश्चिम विभाग आणि मान. उप आयुक्त (परिमंडळ-३) यांच्या मंजूरीनुसार खाली दर्शविलेल्या कामासाठी संस्था / कंत्राट्दारांकडून, बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक, २०२५-२६ च्या अनुषंगाने, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, जुहू तारा रोड, सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई-४०००४९ येथील मध्यवर्ती निवडणूक कार्यालय येथे दिनांक १६/०१/२०२६ रोजी, इलेक्ट्रोनिक्स मतदान यंत्रे व इतर अवजड सामानांची / साहित्यांची ने-आण करण्याकरिता मनुष्यबळ (हमाल) पुरविणेबाबतच्या तातडीच्या कामासाठी, तात्काळ स्थळ दरपत्रिका मागविण्यात येत आहेत.

इच्छुक संस्था / कंत्राट्दारांनी, मुख्य लिपिक (व्यय) एच/पश्चिम, तिसरा मजला, एच/पश्चिम विभाग कार्यालयीन इमारत, दुसरी हसनाबाद गल्ली, खार रोड (पश्चिम), मुंबई-४०००५२, यांच्याकडे, दिनांक १२/०१/२०२६ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत, सदर तातडीच्या कामाकरिता सीलबंद स्थळ दरपत्रिका सादर करावीत. सदर सीलबंद स्थळ दरपत्रिका त्याच दिवशी म्हणजे दिनांक १२/०१/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे वर्णन | अंदाजित किंमत |
|---|---|---|
| १ | बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक, २०२५-२६ च्या अनुषंगाने, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, जुहू तारा रोड, सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई-४०००४९ येथील मध्यवर्ती निवडणूक कार्यालय येथे दिनांक १६/०१/२०२६ रोजी, इलेक्ट्रोनिक्स मतदान यंत्रे व इतर अवजड सामानांची / साहित्यांची ने-आण करण्याकरिता मनुष्यबळ (हमाल) पुरविणेबाबत.<br>वेळ : एकूण दोन पाळीत<br>पहिली पाळी : सकाळी ६.०० ते दुपारी २.०० पर्यंत.<br>दुसरी पाळी : दुपारी २.०० ते संध्याकाळी १०.०० पर्यंत. | रु.१,९०,०००/- |

**नोंद :**

1) सीलबंद स्थळ दरपत्रिका स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार संपूर्णपणे मान. सहाय्यक आयुक्त, एच/पश्चिम विभाग यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली स्थळ दरपत्रिका स्विकारली जाणार नाही.
2) सदर स्थळ दरपत्रिकेमध्ये काही बदल झाल्यास, सहाय्यक आयुक्त, एच/पश्चिम विभागातील सुचना फलकावर लावण्यात येईल.

सही/-

सहाय्यक अभियंता (परिरक्षण) एच/पश्चिम विभाग